# एम.ए भाग २ सत्र –४ पेपर –३ लोकसाहित्य

– प्रा. मनीषा नागपुरे

## लोकसाहित्य संकल्पना स्वरूप आणि व्याप्ती

कोणत्याही साहित्याचा समग्र अभ्यास करावयाचा झाल्यास आपल्याला लिखित साहित्याबरोबरचमौखिक साहित्याचाही विचार करावा लागतो. खेड्यापाड्यातील लोकांनी मौखिक परंपरेने जोपासलेले जेसाहित्य ते म्हणजे लोकसाहित्य असे आपल्याला म्हणता येईल. त्यामध्ये लोककथा, लोकगीते, रूढी, परंपरा,समजूती, लोकविश्वास, लोककला इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. यामधून मानवी मनाचे, समाजव्यवहाराचेआणि संस्कृतीचे प्रकटीकरण होत असते असे दिसते. 'लोकसाहित्य म्हणजे लोकमानसाची कृती–उक्ती.'(व्यवहारे शरद : १९९१ : ७) या व्यवहारेच्या मतानुसार लोकसाहित्य म्हणजे लोकमानसाचा आविष्कार असेम्हणता येईल हे लोकमानस ज्याकृती–उक्तीतून अभिव्यक्त होते त्यांचा समावेश लोकसाहित्यात होतोलोकसाहित्यामध्ये मौखिक आविष्काराबरोबरच भौतिक संस्कृती, लोककला, लोकमानसाची कृती यांना विशेषमहत्त्व आहे; कारण या सर्वामधून एक विशिष्ट्य अशी संस्कृतीचे दर्शन घडते, आणि लोकसाहित्याच्या शब्दबद्ध आविष्कार हा लोकसंस्कृतीचा एक अविभाज्य भाग होय. अशा लोकसाहित्याचे स्वरूप पाहण्यापूर्वी 'लोकसाहित्य' या संज्ञेविषयी थोडा विचार करू इंग्रजीमधील 'Folklore' या शब्दासाठी मराठीत 'लोकसाहित्य' या शब्दाचा वापर केला जातो.याबरोबरच 'लोकविद्या', 'लोकवाङ्मय', 'लोकवार्ता' अशा काही संज्ञा विविध अभ्यासकांनी सूचविल्या आहेत.(शिंदे विश्वनाथ : ३८–४०) 'लोक' आणि 'साहित्य' अशा सामासिक शब्दांनी 'लोकसाहित्य' हा शब्द बनला आहे. या दोन पदांपैकी Folk' साठी 'लोक' आणि lore साठी 'साहित्य' असे शब्द वापरलेले आढळतात लोकम्हणजे दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यक्तिंचा समूह, ज्यात वंश, भाषा, व्यवसाय, धर्म यापैकी एक किंवा अधिक समानतत्वे असतात. त्यांना या तत्वाच्या किंवा तत्त्वाच्या संदर्भात स्वत:ची अशी निराळी परंपरा असते. अशा प्रकारे ॲलन डंडेसने 'लोक' ची संकल्पना स्पष्ट केली आहे. प्रभाकर मांडे म्हणतात 'लोक' या शब्दात अशा जनसमूहांचा समावेश असतो. जे खेड्यात राहतात किंवा शहरात राहतात. ज्यांना स्वत:च्यासांस्कृतिक परंपरांचे व वैशिष्ट्यांचे भान असते. जे परंपरेने चालत आलेले जीवन जगत असतात. ही परंपरा मौखिक स्वरूपात एका पिढीकडून दुसऱ्या पिढिकडे चालत येते. त्यांचे जीवन सहज आणि स्वाभाविक असते.(मांडे प्रभाकर : १९७५ : ९) याबरोबरच महाराष्ट्र शब्दकोशातही विविध अर्थ दिलेले आहेत. शब्दकोशातील अर्थ आणि विविध अभ्यासकांच्या मतांचा विचार करता असे म्हणता येईल की, एका विशिष्ट भूप्रदेशातील सामाजिक आणि सांस्कृतिक एकत्व असणाऱ्या मानव समूहाला 'लोक' असे म्हणता येईलइंग्रजीत वापरला जाणारा Folk हा शब्द आणि भारतात प्राचीन काळापासून वापरला जाणारा 'लोक' हा शब्द दोन्ही शब्द हे समूहवाचक आहेत. लोकसाहित्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या 'लोक' शब्दामध्ये जीवनप्रणालीसंबंधीची एकसंधता अपेक्षित असते. तो विशिष्ट भूप्रदेशात राहणारा, विशिष्ट संस्कृतीने बांधलेला आदिम संस्कृतीशी जवळीक असलेला असतो प्राचीन काळातील अनेक अवशेष आपल्या प्रगत अवस्थेत त्याने टिकवून ठेवलेले असतात. अशा समूहाला 'लोक' ही संज्ञा लागू पडते. यावरून केवळ खेड्यात वास्तव्य असलेलाच म्हणजे 'लोक' नव्हे. थोडक्यात असे म्हणता येईल की रूढ 'लोक' शब्दाची संकल्पना लोकसाहित्यातील 'लोक' पेक्षा भिन्न स्वरूपाची आहे असे म्हणता येईल लोकसाहित्य या शब्दातील पहिल्या 'लोक' पदाचा विचार केल्यानंतर 'साहित्य' या पदाचा प्रस्तुत ठिकाणी करू. लोकसाहित्याला लोकवाङ्मय, लोकविद्या असेही संबोधले जाते. यामधील दुसरे पद हे साहित्य, वाङ्मय, विद्या असे आहे. हे शब्द विविध अर्थाने वापरले जातात. चार वेद, इतिहास, पुराण, सर्वविद्या, उपनिषदे, श्लोक, सूत्रे या विद्या म्हणून ओळखल्या जातात. याबरोबरच व्याकरणशास्त्र, योगशास्त्र, ज्योतिषशास्त्र यांचा समावेश विद्यांमध्ये केला जातो. वाङ्मय या पदासाठी इंग्रजीमध्ये Literature असा शब्द रूढ आहे. हा शब्द साहित्य या शब्दाच्या जवळ जाणारा असला तरी त्यामध्ये फरक आहे तो असा की, वाङ्मय ही संज्ञा मुळात सर्जनात्मक आणि शास्त्रीय वैचारिक अशा समग्र सामग्रीसाठी वापरणे आवश्यक आहे. इंग्रजीमधील Folklore या शब्दासाठी मराठीत 'लोकसाहित्य' या शब्दाचा वापर दुर्गा भागवत यांनी प्रथम केला आणि आज तो रूळलेला दिसतो आहे. पण यातील lore साठी वापरलेला 'साहित्य' याशब्दावर प्रभाकर मांडे यांनी आक्षेप घेतला आहे. पण दुर्गा भागवतांनी संस्कृतमध्ये ज्या अर्थाने साहित्य हा शब्द वापरला आहे त्या अर्थानेच प्रस्तुत शब्द वापरला आहे. 'लोकसाहित्य' या संज्ञेतील दुसरे पद साहित्य, विद्या, वाङ्मय अशा वेगवेगळ्या नावाने उपयोजिले जाते. उपरोक्त विवेचनाचा विचार करता विद्या याशब्दाची व्याप्ती व्यापक स्वरूपाची आहे. 'वाङ्मय' शब्दात वैचारिक शास्त्रीय सामग्रीचा अंतर्भाव होतो त्यामुळे 'विद्या' किंवा 'वाङ्मय' हे दोन्ही शब्द लोकसाहित्यासाठी वापरणे योग्य नाही. त्यामुळे लोकसाहित्य हीच संज्ञा योग्य राहिल. ( शिंदे विश्वनाथ : १९९८ : ४४) हे डॉ. विश्वनाथ शिंदे यांचं मत सार्थ वाटते

**लोकसाहित्याची व्याप्ती :**

मराठीमध्ये लोकसाहित्याची जी व्याप्ती प्रचलित आहे तिचे स्वरूप फारसे काटेकोर दिसत नाही प्रभाकर मांडे यांनी लोकसाहित्याच्या व्याप्तीचे स्वरूप 'लोकसाहित्याचे स्वरूप' या ग्रंथात विस्तारानेसांगितले आहे. त्याचा थोडक्यात विचार खालीलप्रमाणे करता येईल.

१.मौखिक परंपरा –

मौखिक परंपरेत लोककथा, कथागीते, स्त्रीगीते, उपासकांची गाणी, म्हणी, उखाणे, प्रहेलिका, वाक्प्रचार इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. या गोष्टी परंपरेने चालत आलेल्या असतात. त्याचा कर्ता अनामिक असतो. आणि त्यामध्ये समूहमनाचा आविष्कार होत असतो.

२.भौतिक संस्कृती–

यामध्ये शाब्द सामग्रीपेक्षा वेगळ्या गोष्टींचा समावेश होतो. यामध्ये पारंपरिक व्यवसाय, व्यवसायातील कौश्यल्ये, आदिवासींच्या विविध कला, वास्तूशास्त्र, वैद्यकशास्त्र, तोडगे, मंत्रतंत्र या गोष्टींचा समावेश केला आहे.

३.विधी, लोकविश्वास, लोककला, समजुती–

या तिसऱ्या प्रकारात विधिपरंपरा, धार्मिक विधी, संस्कारविधी, परंपरा, श्रद्धा, समजुती, लोकविश्वास, जन्म, बारसे, पाचवी, लग्न, मर्तिक, दृष्ट काढणे, चेटूक सारख्या विधी तसेच पाडवा, होळी, दसरा यासारखे सणउत्सव, ग्रामोत्सव, लोकोत्सव यासारख्या गोष्टींचा समावेश होतो.

४.प्रयोगसिद्ध लोककला–

या चौथ्या प्रकारात मांडेनी लोकसंगीत, विधिनाट्य, लोकनाट्य, लोकनृत्य याबरोबरच नृत्य, नागपंचमी, गौरीगणपतीच्या निमित्ताने होणारी सर्व प्रयोगरूपे इत्यादी गोष्टींचा समावेश केला आह`प्रभाकर मांडे यांनी वरीलप्रमाणे व्याप्ती स्पष्ट केली असली तरी आज सर्व अभ्यासक शाब्द लोकसाहित्य, आणि शाब्देतर लोकसाहित्य असेही वर्गीकरण करताना दिसतात. अशा या लोकसाहित्याच्या काही विशेषांचाही प्रस्तुत ठिकाणी विचार करता यईल.

१. लोकसाहित्याला प्राचीन अशी परंपरा आहे.
२. लोकसाहित्य मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते.
३. परिवर्तनशीलता हा महत्त्वाचा विशेष असल्याने त्यामध्ये नित्यनुतनता दिसून येते.
४. लोकसाहित्यामधून समूहमनाचा तसेच लोकजीवनाचा आविष्कार घडत असतो.
५. लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.
६. लोकसाहित्यातून मानवी इतिहासाचा शोध घेता येतो.
७. लोकसाहित्यामध्ये प्रयोगात्मता असते.
८. लोकसाहित्याला स्थलकालाची बंधने नसतात. ते सर्वकालिक असते.
९. लोकसाहित्य हे परिवर्तनशील असले तरी त्याचा मूळ गाभा तोच असतो.
१०. लोकसाहित्य विधीशी संबंधित असतेउपरोक्त

सर्व विवेचनावरून आणि वैशिष्ट्यांवरून असे म्हणता येईल की, लोकसाहित्य हा समाजजीवनाची गाथा आहे. त्यामध्ये समाजजीवनाचे प्रतिबिंब पडलेले पहावयास मिळते. अनेक भावभावना, अंतरीचा उमाळा ओतप्रत भरलेला असतो. त्यामुळे अभ्यासकाला आगळ्या वेगळ्या आनंदाचा प्रत्यय येताना दिसतो.